# अर्थतज्ज्ञ राजीव कुमार नीती आयोगाचे नवे उपाध्यक्ष

नवी दिल्ली, दि.५ - केंद्र सरकारने आज नीती आयोगाच्या उपाध्यक्षपदी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.राजीव कुमार यांची नियुक्ती केली. ते अरविंद पानगडिया यांची जागा घेतील.



अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांसमवेत कार्य करण्याचा कुमार यांना अनुभव आहे. देशाच्या विविध मंत्रालयांमध्ये आणि आशियाई विकास बँकेत त्यांनी विविध पदे भुपवली आहेत. ते २००६ ते २००८ या कालावधीत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य होते. फिक्की आणि सीआयआय संस्थांचेही कार्य त्यांनी पाहिले आहे.

भारतीय-अमेरिकन अर्थतज्ज्ञ असणाऱ्या पानगडिया यांनी १ ऑगस्टला नीती आयोगाच्या उपाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. पुन्हा कोलंबिया विद्यापीठात अध्यापन कार्यात सक्रिय होण्यासाठी त्यांनी या जबाबदारीतून मुक्त होण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्रात मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर नियोजन आयोगाच्या जागी नीती आयोगाची स्थापना झाली. या आयोगाचे पहिले उपाध्यक्ष म्हणून पानगडिया यांनी जानेवारी २०१५ मध्ये सुत्रे स्वीकारली. दरम्यान, कुमार यांच्याबरोबरच डॉ. विनोद पॉल यांची नीती आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात पॉल यांचे उल्लेखनीय योगदान आहे.

प्रभात
Sun, 06 August 2017
epaper.eprabhat.net/c/21159332